# जाहिरात

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत मालेगाव तालुक्यात एकात्मिक शेती प्रभाग(IFC) ब्लॉक अँकर 1 पद व सीनियर सीआरपी 5 पद या दोन्ही पदाकरिता दिनांक 08/04/026 पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे याबाबतची सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना www.zpwashim.com या वेबसाईटवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

dm-Liv

जिल्हा अभियान व्यवस्थापक जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, उमेद-MSRLM वाशिम

जिल्हा अभियान सह-संचालक,
उमेद तथा प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,वाशिम

Scanned with OKEN Scanner

# जाहिरात

उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM ), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष,मालेगाव तालुक्यात एकात्मिक शेती प्रभाग ( IFC ) या प्रकल्प करिता IFC Block Anchor ( 1 पद ) व SR.CRP (५ पदे ) यांची निवड करायची असल्याने कार्यक्षेत्रातील पात्रताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

पदाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | पदाचे नाव | Block Anchor | शेरा |
|---|---|---|---|
| १ | पदसंख्या | 1 पद | |
| २ | शैक्षणिक अर्हता | १) किमान कृषी व कृषी सलग्न पदवी.<br>जसे की कृषी तंत्रज्ञान Bachelor of science in Agriculture or Bachelor of Science in Horticulture or B.Tech. in Agriculture or Bachelor of science in Fishery, Bachelor of science in Forestry, Bachelor of Veterinary Science & Bachelor of Science in Animal Husbandry, Bachelor of Business Administration पदविधारक असणे आवश्यक. | |
| ३ | मानधन | १) प्रवास देयाकासह निश्चित मानधन २०,०००/-<br>अ) निश्चित मासिक प्रवास देयक रु २५००/- इतके समाविष्ट राहील व सोबत देण्यात आलेल्या मूल्यमापन अहवाल नुसार मासिक मानधन अदा करण्यात येईल.<br>ब) सदर मानधन एकात्मिक शेती प्रभाग संघाची मालकी दिलेल्या प्रभाग संघातून अदा करण्यात येईल. | |
| ४ | अनुभव | १) कृषी क्षेत्रातला किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक. | |
| ५ | निवडीचे निकष | १. वय कमाल ४३ वर्ष.<br>२. कृषी, फलोत्पादन, मत्स्यपालन, पशु पालन, मधमाशी पालन इ. क्षेत्रातील शेती आधारित उपक्रम याबाबत माहिती असणे आवश्यक.<br>३. उत्तम संवाद कौशल्य असणे आवश्यक व समुदायाला सुलभरीतीने समजावून सांगता येणे आवश्यक.<br>४. शेती व शेती आधारित मूल्य वर्धन साखळी उपक्रम अंमलबजावणी बद्दल माहिती असणे आवश्यक,<br>५. तांत्रिक ज्ञान संगणकीय जान असणे आवश्यक. | |
| ६ | भूमिका व जबाबदाऱ्या | १) कार्यक्षेत्रातील प्रभागातील वरिष्ठ ICRP इतर समुदाय संसाधन व्यक्ती यांच्याशी नियमित समन्वय साधून प्रभागाचे कामाचे नियोजन करणे.<br>२) ICRP यांच्याकडून प्रभातील मुलभूत सर्वेक्षण करून, मिळालेल्या माहितीच्या आधारावर सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करणे, व त्याची अंमलबजावणी करणे.<br>३) प्रभागस्तरावर प्रकल्पाचे निरिक्षण आणि मूल्यमापन करून सदरचा अहवाल LSC कार्यकारिणी समिती, जिल्हा व तालुका अभियान कक्षास सादर करणे.<br>४) प्रभागातील महिलांच्या उपक्रमांना (शेतातील पिके, शेतीआधारित उपक्रम, व्यवसाय) यांना प्रत्यक्ष भेटी देऊन कामाचा आढावा घेणे व आवश्यक मार्गदर्शन करणे.<br>५) प्रभागाचा मासिक कृती आराखडा तयार करून आराखडा प्रमाणे कामे होनेस्तव प्रयत्न करणे. तसेच सदर कामाचा अहवाल तालूका अभियान व्यवस्थापक, जिल्हा अभियान व्यवस्थापक आणि जिल्हा व्यवस्थापक उपजिविका यांना दरमहा सादर करणे.<br>६) प्रभागनिहाय प्रोडक्ट डेवलोपमेंट करून त्याची पॅकेजिंग, ब्रेडिंग व सबंधीत मार्केटिंग उपक्रमाकरिता कामे पाहणे तसेच LSC चे व्यवस्थापन करणे, उपक्रम निहाय लेखे व बैठकीचे इतिवृत्त उपक्रमाची अंमलबजावणी करणे.<br>७) प्रभागांमधील विविध प्रक्रिया युनिट (Processing Unit) एकत्रीकरण सेंटर (Collection Centre), निविष्ठा यांची देखरेख करणे तसेच महिलांना तांत्रिक [illegible] | |

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | ८) LSC कामाच्या प्रगतीचा आढावा घेणे, अद्यावत MIS राखणे इ. | |
| ७ | निवड प्रक्रिया | १) लेखी परीक्षा ४० गुण व तोंडी परीक्षा १० गुण एकूण ५० गुण.<br>**लेखी व तोंडी परीक्षेचे निकष :**<br>लेखी परीक्षेची काठीण्य पातळी डिप्लोमा राहील.<br>लेखी परीक्षेचे विषय व गुणांकन पुढील प्रमाणे राहील.<br>बुध्दिमता चाचणी -५ गुण.<br>गणित - ५ गुण.<br>कृषी व कृषी सलग्न ३० गुण.<br>सदर परीक्षा हि बहुपर्यायी असेल.<br>तोंडी परीक्षा हि १० गुणांची असेल. तोडी परीक्षेमध्ये संबंधित व्यक्तीचे संवाद कौशल्य कामाचा अनुभव, प्रात्यक्षिक अनुभव यांसारख्या बाबीच्या आधारावर गुणांकन करण्यात येईल.<br>IFC Block Anchor सेवादाता हे पद निव्वळ कंत्राटी स्वरूपाचे असून तीन वर्ष पर्यंत / प्रकल्प कालमर्यादित राहील, त्यानंतर सदर पद आपोआप रद्द होईल व उमेदवारास कोणतेही मानधन देय राहणार नाही. | |

अध्यक्ष
प्रभाग स्तरीय निवड समिती
एकात्मिक शेती प्रभाग ( IFC ).............................

सचिव
प्रभाग स्तरीय निवड समिती
एकात्मिक शेती प्रभाग ( IFC ).............................

**टीप :-**

**सदरील पदाकरिता परिपूर्ण भरलेले अर्ज ( शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रतीसह) अंतिम दिनांक ०८ / ०४/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत व्यक्तिश: / टपाल द्वारे विहित मुदतीत तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष मालेगाव, पंचायत समिती मालेगाव यांचे कडे पोहचतील अश्या बेताने सादर करावे. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत आणि अश्या अर्जाचा पुढील प्रक्रीये साठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

Scanned with OKEN Scanner